**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ५२/२०१६-१७/९३ दिनांक: १६.०३.२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. ५२/२०१६-२०१७**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. आप्पासाहेब बळवंत पाटील<br>मु. पो. उरुण - इस्लामपूर<br>ता. वाळवा, जिल्हा. सांगली : | **तक्रार<br>अर्जदार<br>(ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली. | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, इस्लामपूर | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग इस्लामपूर-एक | |

**कोरम:-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

१) तक्रारदार श्री आप्पासाहेब बळवंत पाटील, रा. उरुण-इस्लामपूर ता. वाळवा. जि. सांगली यांनी सदरचे गा-हाणे त्याना कृषी पंपासाठी वीज जोडणी त्वरीत मिळणेसाठी दाखल केले आहे.

## गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.

२) एप्रिल २०१६ मध्ये तक्रारदार यांनी त्यांच्या शेत जमिनीमध्ये कुपनलिका खोदली आणि नंतर शेती पंपासाठी वीज जोडणी मिळणेचा अर्ज सादर करुन कोटेशनची रक्कम रु. ४,११६/- भरणा केली. परंतु त्यांना तीन महिन्यामध्ये वीज जोडणी मिळाली नाही. तक्रारदार यांनी मोठे शेती कर्ज काढून आर्थिक गुतवणूक केली आहे. परंतु वीज जोडणी मिळाली नसल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. ०५-११-२०१६ रोजी तक्रार दाखल केली. सदर कक्षाने दि.३०.१२.२०१६ रोजी आदेश करुन, तक्रारदार यांना जेष्ठता यादीप्रमाणे वीज जोडणी देणेत येईल असा निर्णय जाहिर केला. सदर निर्णयावर नाराज होऊन तक्रारदार यांनी प्रस्तुतचे अपिल या मंचासमोर दि. २०.०१.२०१७ रोजी दाखल केले आहे.

## वि. प. यांची भूमिका.

३) वि.प. तर्फे लेखी निवेदन सादर केले असून त्यात असे कथन केले आहे की, तक्रारदार यांना वीज कनेक्शन देण्यासाठी ०.०१ उच्च दाब वाहिनी, ०.५४ कि.मी. लघुदाब वाहिनी आणि ६३ के.व्ही. ए. रोहित्र यांची उभारणी करावी लागणार आहे. संबंधीत जेष्ठता यादीत तक्रारदार यांचा २१२ वा क्रमांक नमूद आहे. त्यांच्या अगोदर इतर १७३ ग्राहक प्रतिक्षेत आहेत. त्या १७३ ग्राहकांवर अन्याय होणार आहे. वि.प. यांनी शेवटी नमूद केले की तक्रारदार यांना प्रतिक्षा यादीप्रमाणे योग्य वेळी वीज जोडणी देणेत येत आहे.

४) या प्रकरणाची सुनावणी दि. १४.०३.२०१७ रोजी या मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी तक्रारदार स्वतः हजर होते आणि त्यांनी तोंडी निवेदन दिले. वि.प. तर्फे कार्यकारी अभियंता श्री उस्मान शेख हे उपस्थित होते आणि त्यांचेही तोंडी निवेदन ऐकण्यात आले आहे. उपलब्ध सर्व कागदपत्रे वाचणेत आली आहेत.

५) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत.

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणीनुसार नविन शेती पंपासाठी वीज जोडणी देण्याचा आदेश करणे योग्य होईल काय?
उत्तरः- होय.

२) कोणता अंतिम आदेश?
उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## कारणमिमांसा

६) तक्रारदार यांनी या प्रकरणात कोणत्याही स्वरुपाची नुकसान भरपाई मागणी केलेली नाही. त्यांची मागणी फक्त नविन वीज जोडणी (कृषी पंपासाठी) मिळणेबाबत सादर केलेली आहे.

७) तक्रारदार यांनी त्यांच्या शेत जमिनीत कुपनलीका खोदल्यानंतर त्यांनी ३ अश्वशक्ती कृषीपंपासाठी नविन वीज कनेक्शन मिळणेसाठी वितरण कंपनीकडे अर्ज सादर करुन दि. ०६.०५.२०१६ रोजी कोटेशनची जरुर ती रक्कम भरणा केली आहे. याबाबत वाद नाही. तक्रारदार यांना तीन महिन्यांच्या कालावधीत वीज जोडणी मिळणे नियमानुसार आवश्यक होते. तक्रारदार यांचा जेष्ठता यादीमध्ये २१२ वा क्रमांक आहे. तक्रारदार यांना वीज जोडणी दिल्यास इतर शेतक-यावर अन्याय होईल असे वि.प. यांचे निवेदन आहे.

८) तथापि, विद्युत कायदा २००३ मधील कलम ४३ तसेच मा. वीज नियामक आयोगाने जारी केलेले नियम व निर्देश यांचा विचार करता तक्रारदार यांना निश्चित कालावधीत वीज जोडणी मिळणेचा अधिकार आहे. कृती मानके निनियमानुसार, वितरण कंपनीस जर अडचणी येत असतील तर अशा अडचणी दूर करुन घेण्यासाठी वि.प. यांना मा. आयोगाकडे धाव घ्यावी. लागेल. सारांश , जेष्ठता यादी आहे किंवा निधी उपलब्ध नाही अथवा कंत्राटदार नेमलेला नाही. या आणि अशा प्रकारचा कारणा वरुन तक्रारदार यांचे गा-हाणे नाकारता येणार नाही.

९) सबब, तक्रारदार यांना निश्चत कालावधीत वीज जोडणी देणेत यावी असा आदेश करणे योग्य व न्यायाचे होईल.

१०) वरील सर्व परिस्थितीचा विचार करुन आणि संबंधीत कायद्यांमधील तरतूदीचाही विचार करुन तक्रारदार यांचे गा-हाणे मंजूर करणे क्रमप्राप्त आहे. सबब, खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येत आहे.

## आदेश

१) तक्रारदार श्री आप्पासाहेब बळवंत पाटील रा. उरुण इस्लामपूर ता. वाळवा जि. सांगली यांना त्यांच्या मागणी प्रमाणे कृषी पंपासाठी नविन वीज जोडणी दि. १५.०६.२०१७ पर्यन्त वि.प. यांनी द्यावी असा वि.प. यांना आदेश करणेत येत आहे.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |